# 25 फेब्रुवारी

## आजचा सुविचार :

ज्यावेळी देवाचा राग येईल त्यावेळी ॲक्सिडेंटल हॉस्पिटल मधून चक्कर मारून या, स्वत:ला नशीबवान समजाल !

## आजचे पंचांग :

वार – शुक्रवार  
दिनांक : 25 फेब्रुवारी 2022  
मास – माघ  
नक्षत्र – ज्येष्ठा  
सुर्योदय – सकाळी 6.55 वाजता  
सूर्यास्त – सायंकाळी 6. 38 वाजता

## आजचे दिनविशेष :

2013 ला रशियन सरकार ने रस्त्यांवर आणि शाळेच्या जवळपास धूम्रपान न करण्याचा नवीन कायदा बनवला.

2001 ला ऑस्ट्रेलिया चे प्रसिद्ध क्रिकेटर डॉन ब्रॅडमन यांचे निधन.

## आजचे इंग्लिश शब्द :

1) Display – प्रदर्शन  
2) Doctor - डॉक्टर  
3) Domestic – घरगुती  
4) Driver – वाहक / ड्रायव्हर

## आजची प्रश्नमंजुषा :

1) गायीला किती पाय असतात?

2) क्रिकेट या खेळामध्ये किती खेळाडू असतात?

3) रवंथ करणाऱ्या प्राण्यांची नावे सांगा.

4) त्रिमितीय आकृत्यांची नावे सांगा.

**बोधकथा :**

## सोनेरी स्पर्श

ही गोष्ट एका लोभी श्रीमंत माणसाची आहे. एकदा वाटेत त्याला परी भेटली.परीचे केस झाडाच्या फांद्यांमध्ये अडकले होते. पैसे कमावण्याची ही नामी संधी आहे असा विचार करून, त्याने मदतीच्या बदल्यात एक वर मागितला, “तो म्हणाला मी ज्याला स्पर्श करीन त्याचे सोन्यात रुपांतर झाले पाहिजे.” त्याची ही इच्छा कृतज्ञ परीने मान्य केली. लोभी मनुष्य त्याला मिळालेल्या नवीन वराविषयी, आपल्या मुलीला व बायकोला सांगण्यासाठी घराकडे धावला. सगळा वेळ दगड, गोट्यांना स्पर्श करून सोन्यात रुपांतर करीत राहिला. तो घरी आला तेंव्हा त्याची मुलगी त्याच्याकडे धावत येवून त्याला बिलगली,. तो तिला कडेवर घेण्यासाठी खाली वाकला, मुलीला त्याचा स्पर्श होताच मुलीचे रुपांतर सोन्याच्या पुतळ्यात झाले. त्याला त्याची चूक लक्षात आली आणि नंतर तो मनुष्य, परीने दिलेला वर मागे घेण्यासाठी तिला शोधू लागला.

तात्पर्य – लोभीपणा अधोगतीला कारणीभूत ठरतो.